# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : **chandrapur.rdc@gmail.com** फोन क्रमांक – 07172-250659
क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/ 697 दिनांक :- 15 जुलै, 2020

**संदर्भ** :- 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 कलम 34(C) 34(M).
2. भारतीय साथरोग अधिनियम 1897
3. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दि. 29.06.2020.
4. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/645 दि.30.06.2020.

**-: आदेश :-**

**फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये मनाई आदेश**

ज्याअर्थी महाराष्ट्र राज्यांतर्गत कोरोना विषाणुचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असुन महाराष्ट्र शासन, आरोग्य विभागाव्दारे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता साथरोग प्रतिबंध कायदा, 1897 लागु करुन त्यातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यात आली आहे व त्याकरिता अधिसुचना व नियमावली निर्गमित करण्यात आल्या आहेत. व त्याअनुषंगाने राज्य शासनाकडील संदर्भिय क्रं. 03 वरील आदेशाचे अनुषंगाने या कार्यालयाकडील संदर्भिय क्रं. 04 वरील आदेशान्वये काही प्रमाणात शिथीलता देऊन दिनांक 01.07.2020 ते दिनांक 31.07.2020 या कालावधीकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1)(3) अन्वये मनाई आदेश चंद्रपूर जिल्हयाकरिता निर्गमीत करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार असुन गतीने पसरत असल्याने प्राप्त होत असलेल्या दैनंदिन अहवालानुसार चंद्रपूर शहरातील अनेक व्यक्तीचे अहवाल कोरोना पॉझिटीव्ह असल्याचे निदर्शनास आल्याने व सदर पॉझिटीव्ह रुग्ण हे शहरातील इतर नागरीकांच्या संपर्कात आल्याची शक्यता नाकारता येत नसल्याने सदर पॉझिटीव्ह रुग्णाच्या संपर्कात आलेल्या नागरीकांचा लवकरात लवकर शोध घेणे आवश्यक आहे ज्यामुळे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणे शक्य होईल. तसेच शहरातील इतर भागात कोरोना पॉझिटीव्ह रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता कोरोनाग्रस्त रुग्णांचे संपर्कात आल्यास सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक होत असल्याने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता कडक निर्बंध लावणे याप्रकारचे प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी **डॉ. कुणाल खेमनार, जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर** फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 (1974 चे 2) चे कलम 144 नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन दिनांक 17.07.2020 चे 00.00 ते दिनांक 26.07.2020 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर तसेच चंद्रपूर तालुक्यातील ऊर्जानगर व दुर्गापुर ग्रामपंचायत हद्दीत लागु करीत **आहे.**

❖ **चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर व चंद्रपूर तालुक्यातील ऊर्जानगर , दुर्गापुर ग्रामपंचायत क्षेत्रात नागरीकांचे आवागमनसह खालील आस्थापना संपुर्णत: बंद करणेत येत आहेत :-**

1) सर्व किराणा दुकाने, सर्व किरकोळ व ठोक विक्रेते, सर्व इतर व्यवसाय करणारे व्यापारी दुकाने/आस्थापना दिनांक 17.07.2020 चे 00.01 ते दिनांक 21.07.2020 चे सकाळी 09.00 वाजेपर्यंत संपुर्णत: बंद राहतील.

तद्नंतर दिनांक 21.07.2020 ते दिनांक 26.07.2020 या कालावधीत सकाळी 09.00 ते दुपारी 02.00 वाजेपर्यंत केवळ अत्यावश्यक वस्तुंचा पुरवठा करणारी दुकाने व त्यांचे ठोक विक्रेते जसे खाद्य पदार्थ, किराणा , दुध, दुग्धजन्य पदार्थ, ब्रेड, फळे, भाजीपाला, अंडी, मांस, मासे, बेकरी, पशु खाद्य, कृषी विषयक आस्थापना यांची दुकाने सुरु राहतील. **यव्यतिरिक्त इतर सर्व प्रकारची दुकाने व आस्थापना बंद राहतील.**

2) उपहारगृह, लॉज, हॉटेल, (शिवभोजर थाळी, वंदे भारत योजनेंतर्गत कोविड-19 करिता वापरात असलेले हॉटेल, डॉक्टर्स, स्टाप नर्स साठी यांचे निवासकामी असलेली हॉटेल, इन्स्टिटयुशनल क्वारंटाईन साठी घेतलेले हॉटेल व इतर इमारती वगळुन) रिसोर्ट, मॉल, बाजार, मार्केट संपुर्णत: बंद राहतील.

3) **Zomato, Swigy, Dominos** व तत्सम ऑनलाईन पोर्टलवरुन मागविले जाणारे खाद्यपदार्थ पुरवठा सेवा तसेच हॉटेल, रेस्टॉरंट यांचेमार्फत देण्यात येणारी घरपोच सेवा दिनांक 17.07.2020 चे 00.01 ते दिनांक 21.07.2020 चे सकाळी 09.00 वाजेपर्यंत संपुर्णत: बंद राहतील. **तदनंतर दिनांक 21.07.2020 ते दिनांक 26.07.2020 या कालावधीत घरपोच सेवा सुरु राहतील.**

4) सार्वजनिक / खाजगी क्रिडांगणे/मोकळया जागा, उद्याने, बगीचे हे संपुर्णत: बंद राहतील तसेच सार्वजनिक ठिकाणी Morning Walk, व Evening Walk करणेस संपुर्णत: प्रतिबंध राहील.

5) सर्व केश कर्तनालय, सलुन / स्पा/ ब्युटी पार्लर दुकाने संपुर्णत: बंद राहतील.

6) सर्व किरकोळ व ठोक विक्रीचे ठिकाणे मोंढा/आडत भाजी मार्केट/फळे विक्रेते/आठवडी व दैनिक बाजार/फेरीवाले हे सर्व ठिकाणे **दिनांक 17.07.2020 चे 00.01 ते दिनांक 21.07.2020 चे सकाळी 09.00 वाजेपर्यंत संपुर्णत: बंद राहतील.**

तद्नंतर दि. 21.07.2020 ते दिनांक 26.07.2020 या कालावधीत केवळ सर्व अत्यावश्यक किरकोळ व ठोक विक्रीचे ठिकाणे मोंढा/आडत भाजी मार्केट/फळे विक्रेते/ दैनिक बाजार/फेरीवाले सकाळी 09.00 ते दुपारी 02.00 वाजेपर्यंत सुरु राहतील.

7) **मांस, मासे, चिकन, अंडी, इत्यादीची विक्री दिनांक 17.07.2020 रोजीचे 00.01 वा पासुन दिनांक 21.07.2020 चे सकाळी 09.00 वाजेपावेतो संपुर्णत: बंद राहतील.**

तद्नंतर दि. 21.07.2020 ते दिनांक 26.07.2020 या कालावधीत सकाळी 09.00 ते दुपारी 02.00 वाजेपर्यंत सुरु राहतील.

8) शाळा, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण संस्था सर्व प्रकारचे शिकवणी वर्ग संपुर्णत: बंद राहतील.

9) सार्वजनिक व खाजगी प्रवासी दोन चाकी, तिन चाकी व चार चाकी वाहने संपुर्णत: बंद राहतील. तथापि अत्यावश्यक सेवेतील वाहने, वैद्यकीय कारणास्तव प्रवासासाठी खाजगी वाहनांचा वापर अनुज्ञेय राहील परंतु वैद्यकीय कारणास्तव प्रवासाकरिता वैद्यकीय प्रमाणपत्र जोडुन उपविभागीय दंडाधिकारी, चंद्रपूर यांचेकडून ई-पास उपलब्ध करुन घेण्यात यावे. तसेच दि. 17.07.2020 ते दि. 26.07.2020 या कालावधीसाठी चंद्रपूर महानगरपालिका, दुर्गापुर ग्राम पंचायत व ऊर्जानगर ग्रामपंचायत क्षेत्रातील नागरीकांना देण्यात आलेले ई-पास या आदेशाव्दारे रद्द समजण्यात यावे. तसेच बाहेरुन येणा-या नागरीकांना (वंदे भारत मिशन अंतर्गत परदेशातुन येणारे नागरीक वगळुन) सदर महानगरपालिका हद्दीत प्रवेशास मनाई असेल.

10) सार्वजनिक प्रवासी वाहतुकीतील एस.टी. बस ही अत्यावश्यक सेवेतील शासकीय कर्मचारी व परवानगी प्राप्त उद्योगातील अधिकृत कर्मचारी यांचेकरिता सुरु राहील.

11) सर्व प्रकारची खाजगी बांधकाम/कंन्स्ट्रक्शनची कामे संपुर्णत: बंद राहतील. तथापि ज्या बांधकामाच्या जागेवर कामगारांची निवास व्यवस्था असेल त्यांना काम सुरु ठेवता येईल तसेच शासनाची शासकीय कामे सुरु राहतील.

12) सर्व चित्रपटगृह, व्यायामशाळा, जलतरण तलाव, करमणुक व्यवसाय, नाटयगृह, कलाकेंद्र, प्रेक्षागृह, सभागृह संपुर्णत: बंद राहतील.

13) सर्व प्रकारचे मंगल कार्यालय, लॉन, हॉल तसेच लग्न समारंभ, स्वागत समारंभ, बंद राहील. तसेच दिनांक 17.07.2020 ते दिनांक 26.07.2020 या कालावधीत यापुर्वीच ज्या नागरीकांना लग्न समारंभ आयोजित करण्याकरिता देण्यात आलेली परवानगी याव्दारे रद्द करण्यात येत आहे. सदर कालावधीत कोणत्याही समारंभास परवानगी नसेल.

14) सर्व प्रकारच्या खाजगी आस्थापना कार्यालये संपुर्णत: बंद राहतील.

15) सामाजिक/राजकीय/क्रिडा/मनोरंजन/सांस्कृतिक/धार्मिक कार्यक्रम व सभा संपुर्णत: बंद राहतील.

16) धार्मीक स्थळे/सार्वजनिक प्रार्थनास्थळे सामान्य नागरीकांकरिता संपुर्णत: बंद राहतील तथापि तेथील नित्य नियमाचे धार्मीक कार्यक्रम संबधीत धर्मगुरु, पुजारी यांना करता येतील.

17) E-Commerce सेवा उदा. AMOZON, FLIPKART व यासारख्या तत्सम सेवा दिनांक 17.07.2020 रोजीचे 00.01 ते दिनांक 21.07.2020 रोजीचे सकाळी 09.00 वाजेपर्यंत संपुर्णत: बंद राहतील.

**आणि तद्नंतर दिनांक 21.07.2020 ते दिनांक 26.07.2020 या कालावधीत सकाळी 09.00 ते दुपारी 02.00 वाजेपर्यंत सुरु राहतील.**

❖ **चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर व चंद्रपूर तालुक्यातील ऊर्जानगर व दुर्गापुर ग्रामपंचायत हद्दीत खालील अत्यावश्यक बाबी/सेवा मर्यादीत स्वरुपात व निर्बंधासह सुरु राहील :-**

1) घरपोच दुधाचे वितरण सकाळी 06.00 ते 10.00 या कालावधीत अनुज्ञेय राहील.

2) सर्व खाजगी व सार्वजनिक वैद्यकीय सेवा, पशुचिकीत्सा सेवा त्यांचे नियमीत वेळेत सुरु राहतील.

3) सर्व रुग्णालये, औषधालये तसेच रुग्णालयाशी निगडीत सेवा आस्थापना त्यांचे नियमीत वेळेनुसार सुरु राहतील व कोणतेही रुग्णालय लॉकडाऊनचा आधार घेऊन रुग्णांना अत्यावश्यक सेवा नाकारणार नाही अन्यथा संबधीत रुग्णसेवा संस्था कारवाईस पात्र राहील.

4) सर्व मेडिकल दुकाने सकाळी 09.00 ते दुपारी 07.00 या वेळेत सुरु राहतील तथापि ऑनलाईन औषध वितरण व सेवा व रुग्णालय संलग्न औषधांची दुकाने 24 तास सुरु राहील.

5) सर्व मा. न्यायालये व राज्य शासनाचे / केंद्र शासनाचे कार्यालय तसेच शासन अंगीकृत उपक्रम व स्थानिक स्वराज्य संस्थाची कार्यालये सुरु राहतील. शक्य असलस Work From Home चा पर्याय वापरण्यात यावा, शासकीय कार्यालयांना आवश्यक कर्मचा-यांसाठी पासची आवश्यकता राहणार नाही. तथापि संबधीत शासकीय कर्मचा-यांने स्वत:चे ओळखपत्र सोबत बाळगणे अत्यावश्यक राहील.

6) पेट्रोलपंप व गॅस पंप सकाळी 09.00 ते सायं. 06.00 या वेळेत सुरु राहतील. शासकीय वाहने, वैद्यकीय सुविधा पुरवणारी वाहने, अत्यावश्यक सेवेतील व पुरवठा साखळीतील वाहने, कृषी व्यवसायाशी निगडीत सर्व यंत्र व वाहने, कार्यरत असलेले उद्योग व औद्योगिक आस्थापनेशी संबधीत वाहने, सर्व प्रकारची मालवाहतुक वाहने, वृत्तपत्र व्यवसायाशी सबंधीत वाहने व शासनाने वेळोवेळी परवानगी दिलेली वाहने यांना इंधनपुरवठा करावा. याव्यतिरिक्त इतर कोणासही इंधनाचा पुरवठा करण्यात येऊ नये.

7) एलपीजी गॅस सेवा, घरपोच गॅस वितरण, रेशन दुकान नियमानुसार सुरु राहील.

8) निर्यात होणा-या वस्तुंची वाहतुक शासन नियमानुसार सुरु राहील.

9) दैनिक वर्तमानपत्रे, नियतकालिके याची छपाई व वितरण व्यवस्था तसेच डिजीटल/प्रिंटमिडीया याची कार्यालय शासकीय नियमानुसार सुरु राहतील. वर्तमानपत्र वितरण सकाळी 06.00 ते 09.00 या वेळेमध्ये अनुज्ञेय राहील.

10) संस्थात्मक अलगीकरण / विलगीकरण व कोविड केअर सेंटरकरीता ताब्यात घेतलेल्या व मान्यता दिलेल्या कार्यालयाच्या जागा, इमारती नियमानुसार सुरु राहतील.

11) सर्व राष्ट्रीयकृत व आरबीआयने मान्यता दिलेल्या बँका, सहकारी बॅका, गाव पातळीवरील विविध कार्यकारी सोसायटी, एलआयसी कार्यालय किमान मनुष्यबळासह सकाळी 09.00 ते दुपारी 02.00 या कालावधीत (लोकांच्या सेवेचा वेळ व कार्यालयीन कामाचा वेळे दोन्ही धरुन) सुरु राहतील. बँकेच्या इतर ग्राहकसेवा (उदा. ऑनलाईन, एटीएम इत्यादी) सुरु राहतील.

12) मा. न्यायालयाचे अधिकारी, कर्मचारी, मा. न्यायाधीश, वकील, शासकीय केंद्र व राज्य शासनाचे कर्मचारी, शासन अंगीकृत कर्मचारी, डॉक्टर नर्स, अंगणवाडी कर्मचारी, आशा वर्कर, वर्तमानपत्र, पिंटींग व डिजीटल मिडीयाचे कर्मचारी, फार्मा व औषधी संबधीत मेडीकल शॉपचे कर्मचारी, दुध विक्रेते, अत्यावश्यक सेवा-कृषी सेवा केंद्र, बी-बियाणे व औषधाचे दुकान, खते गॅस वितरक, पाणीपुरवठा, आरोग्य व स्वच्छता करणारे शासकीय व खाजगी कामगार, अग्निशामक सेवा, जलनिस्सारण तसेच पुर्व पावसाळी व पावसाळया दरम्यान करावयाची अत्यावश्यक कामे करणारे, वीज वहन व वितरण कंपनीचे कर्मचारी, महसुल विभागाचे कर्मचारी, पोलीस विभागाचे कर्मचारी, पोस्ट विभाग, दुरसंचार विभाग, तसेच कंन्टेनमेंट झोनकरिता नियुक्त कर्मचारी यांनाच दुचाकी, चारचाकी वाहन वापरण्यास परवानगी राहील. या सर्व कर्मचारी/अधिकारी यांनी स्वत:चे कार्यालयाचे ओळखपत्र तसेच शासकीय कर्मचारी सोडून इतरांना स्वत:चे आधारकार्ड सोबत ठेवणे व वाहनाचे आवश्यक परवाने सोबत ठेवावे. या सर्वांना फक्त शासकीय कामासाठी अथवा त्यांचे कामाचे जबाबदारी नुसार व शासकीय अथवा त्यांच्या संस्थेने दिलेल्या वेळेतच वाहन वापरता येईल.

13) औषध व अन्न उत्पादन सलग प्रक्रिया आणि निर्यात उद्योग व त्यांचे पुरवठादारी निमयानुसार चालु राहतील व यासाठी एमआयडीसी पोर्टल वरुन देण्यात आलेल्या परवानग्या ग्राहय धरण्यात येईल.

14) एमआयडीसी किंवा खाजगी जागेवरील सध्या चालु असलेले सर्व औद्योगिक आस्थापना दि. 17.07.2020 ते दिनांक 21.07.2020 या कालावधीत केवळ सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन आवश्यक कर्मचारी यांची उपस्थिती ठेवुन सुरु ठेवता येतील. तदनंतर दिनांक 21.07.2020 ते दिनांक 26.07.2020 या कालावधीत पुर्ववत सुरु करता येतील. तसेच या आस्थापनातील कर्मचारी/कामगार यांना कामावर जाण्यासाठी व परतीसाठी कंपनीकडील/आस्थापनाकडील ओळखपत्र जवळ बाळगणे बंधनकारक राहील. यासाठी परवानगी देण्यात आलेल्या कर्मचारी यांना दोन चाकी (01 व्यक्तीस) व चारचाकी वाहन (03 व्यक्तीस-चालकासह) किंवा कंपनीने प्राधिकृत केलेली प्रवासी बस (50 टक्के क्षमतेने) वापरण्यास परवानगी राहील.

15) उपरोक्त हद्दीतील सुरु असलेले शासकीय कामे व राष्ट्रीय प्रकल्पाचे कामे सुरु राहतील.

16) वृध्द व आजारी व्यक्तीकरिता नियुक्त केलेले मदतनिस यांच्या सेवा सुरु राहतील.

**17) सर्व वैद्यकीय, व्यावसायिक परिचारीका, पॅरामेडिकल कर्मचारी , सफाई कर्मचारी व रुग्णवाहिका यांना वाहतुकीसाठी परवानगी राहिल. त्यासाठी वेगळा पास अथवा परवानगी घेणेची आवश्यकता नाही.**

**वरील आदेशची अंमलबजावणी करीत असताना कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक ते कृत्य व सद्रदेतुन केलेल्या कोणत्याही कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 73 नुसार कुठल्याही प्रकारची कायदेशिर कार्यवाही अथवा खटला दाखल करता येणार नाही.**

सदरील आदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा, 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188, 269, 270, 271 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**सदरचा आदेश माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करुन दिनांक 17/07/2020 चे 00.01 ते दिनांक 26/07/2020 चे 24.00 वाजेपर्यंतचे कालावधीकरिता लागु राहतील.**

सही/-
(डॉ. कुणाल खेमनार)
जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

जिल्हा दंडाधिकारी कार्यालय चंद्रपूर

**प्रतिलीपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.**

1. मा. आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
2. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
4. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
5. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. चंद्रपूर
6. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
7. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
8. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
9. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत (सर्व)
10. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)

**सदर आदेशाची उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

15/07/20
जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर